N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड    **P.S.(ठाणे):** अलीबाग    **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0029    **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/02/2020 02:42 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Date From (दिनांक पासून):** 06/02/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/02/2020

**Time From (वेळेपासून):** 15:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:52 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/02/2020    **Time (वेळ):** 02:25 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003    **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/02/2020 02:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालय,कॅन्टीन आवारात , अलिबाग ,अलिबाग

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** अलीबाग

**District(State) (जिल्हा(राज्य)):** रायगड(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रिजवानअली मन्सुरअली शेख

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978    **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**    **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 103/4,हिंदुस्थान हौसींग सोसायटी,कामराज नगर, घाटकोपर पूर्व, ,मुबई ,मुबई ,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 103/4,हिंदुस्थान हौसींग सोसायटी,कामराज नगर, घाटकोपर पूर्व, ,मुबई ,मुबई ,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9161911414

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत शंकर मांडलेकर | | | 1. धोंडखार पो कोकबन,रोहा,रोहा,रायगड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम त्यामध्ये 2000/ रू. दराच्या 10 नोटा आणि 500/ रूपये दराच्या एकुण 2 नोटा असे एकुण 21,000/ | 21,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 21,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी रिजवानअली मन्सुरअली शेख, वय 42 वर्षे, व्यवसाय - कन्ट्रक्टर, रा.रूम नं.103/4, हिंदुस्थान हौसींग सोसायटी, कामराज नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबरई-400 077 (मो.नं.9161911414) तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. श्री.झकेरीया इसाक पटेल, रा. 201, साईसंकल्प, सेक्टर-27, प्लट नं.23, नेरूळ, नवीमुंबई यांचे नावे मौजे नेरे येथे सर्वे नं.396, ता.पनवेल, जिल्हा-रायगड येथे असलेल्या जमिनीवर ते साहारा होम्स बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स या नावाने इमारत बांधण्याचा प्रोजेक्ट सुरू आहे. सदर प्रोजेक्टमध्ये श्री.श्यामराव काशिनाथ कदम व श्री.सत्यवान कृष्णा शिर्के यांनी सदनिका बुकींग केल्या होत्या. सदर प्रोजेक्टची जमिन ही गुजरात-अलिबाग हायवेमध्ये जात असल्याने शासनाची श्री.झकेरीया इसाक पटेल यांना इमारत बांधकाम करण्यास मनाई करण्याची नोटीस आली. त्यामुळे सदर बांधकाम थांबविण्यात आले. त्यामुळे श्री.झकेरीया इसाक पटेल हे श्यामराव कदम, सत्यवान शिर्के व इतर यांना सदनिका देऊ शकले नाहीत. त्यामुळे श्री.श्यामराव काशिनाथ कदम व इतर लोकांनी श्री. झकेरीया पटेल यांचे विरूध्द अलिबाग येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच येथे तक्रारी केल्या. त्यांचे तक्रार क्रमांक 433/15, 396/2015, 432/15 व 537/2016 असे आहेत. सदर कामांचा व इतर शासकिय कार्यालयातील कामांचा पाठपुरावा करण्यासाठी श्री.पटेल यांनी मला अधिकारपत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे मी त्यांचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या कार्यालयातील केसेसचा पाठपूरावा करत होतो.सदर तक्रारींचा निकाल श्री.पटेल यांचे विरोधात लागल्याने त्यांनी स्टेट कमिशन फोरम कोर्ट, मुंबई यांचे न्यायालयात दाद मागण्यासाठी सदर केसचे कागदपत्रांचे नकला संच मिळण्यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच रायगड-अलिबाग येथे देण्यासाठी अर्ज तयार करून माझेकडे दिला, सदर अर्ज मी दिनांक 31/01/2020 रोजी श्री.प्रशांत मांडलेकर, लिपीक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच रायगड-अलिबाग यांचेकडे दिला. त्यावेळी ते मला म्हणाले की, अर्जाची पोहोच तुम्हाला मोबाईलवर पाठवितो. त्यावेळी श्री.प्रशांत मांडलेकर मला म्हणाले की, सदर कागदपत्र मिळण्यास तुम्हाला तीन महिने लागतील, परंतु तुम्ही चार केसेसचे मिळून एकूण एकविस हजार रूपये दिलेतर सदर कागदपत्र मी तुम्हाला दोन दिवसांत देईन. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी पैशाबाबत पटेल शेठना विचारून मी सांगतो असे बोलून तेथून निघून आलो. यापूर्वी सदर प्रकरणात श्री.प्रशांत मांडलेकर यांनी माझेकडून चार हजार रूपये घेतले होते. त्यानंतर त्यांनी दिनांक 03/02/2020 रोजी त्यांचा मोबाइ्इल क्रमांक 8983142711 वरून माझा मोबाईल क्रमांक 9161911414 वर अर्जाची पोहोच पाठविली. त्यानंतर श्री.प्रशांत मांडलेकर हे लाच मागत असलेबाबत मी श्री.पटेलशेठ यांना सांगीतले. श्री.प्रशांत मांडलेकर, लिपीक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच रायगड-अलिबाग यांचे बोलण्यावरून माझी व श्री.पटेलशेठ यांची खात्री झाली की, त्यांना लाचेची रक्कम



Scanned by CamScanner

दिल्याशिवाय ते सदर केसच्या नकला संच मला देणार नाहीत. श्री.पटेलशेठ यांची व माझी श्री.प्रशांत मांडलेकर यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी श्री. मांडलेकर यांचे विरूध्द लाच मागणी संदर्भात कायदेशिर कारवाई होणे करीता दिनांक. 05/02/2020 रोजी 16-30 वाजता पोलीस निरीक्षक श्री. बकाले, अँन्टी करप्शन ब्यूरो रायगड यांचेकडे तक्रार दिली होती. त्यावेळी पो.नि. बकाले यांनी मला पुढील कारवाइ करीता दिनांक. 06/02/2020 रोजी 10-00 वाजता अँन्टी करप्शन ब्यूरो कार्यालयात हजर रहाण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिनांक. 06/02/2020 रोजी 10-00 वाजता अँन्टी करप्शन ब्यूरो कार्यालय रायगड-अलिबाग येथे येवून पोलीस निरीक्षक श्री. बकाले यांना भेटलो. पोलीस निरीक्षक बकाले यांनी जिल्हा परिषद कार्यालयातील आलेले दोन पंच साक्षीदार व पथकातील कर्मचारी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि बकाले यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी दोन पंचासमक्ष करण्यात येणार असल्याचे सांगून त्या अनुषंगाने करावयाच्या कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर श्री. बकाले साहेब यांचे सुचनेप्रमाणे मी माझी सविस्तर तक्रार दोन्ही पंचांना तोंडी सांगीतली. त्यानंतर बकाले साहेबांनी माझी दिनांक 05/02/2020 रोजीची तक्रार दोन्ही पंचांस वाचावयास दिली. ती त्यांनी वाचून पाहीली. सदर तक्रार व मी सांगितलेली हकीगतीप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी श्री. बकाले साहेब यांचे सूचनेप्रमाणे त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोनि श्री.बकाले साहेबांनी त्यांचेकडील कर्मचारी यांचे मार्फत एक डिजिटल व्हाईस रेकर्डर मशीन दाखवून त्याबाबत मला व पंचांना माहिती देवून त्या रेकर्डमध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकून मेमरीकार्ड मध्ये अगर रेकर्डरच्या इनबिल्ट मेमरी मध्ये कोणतीही यापुर्वीचा आवाज अगर संभाषण नसल्याची खात्री करून देवून सदर व्हाइ्इस रेकर्डरवर माझे व दोन्ही पंच यांचे 10-38 वाजता वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून घेतले. त्यानंतर पंच क्र.1 श्री.काथारा यांचेसोबत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच रायगड येथे जावून लोकसेवक श्री.प्रशात मांडलेकर यांची भेट घेवून त्यांचेशी प्रलंबित प्रकरणा बाबत चर्चा करून त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडे अवधी मागून घेण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे पोशि/माळी यांनी व्हाईस रेकर्डर सुरू करून देवुन तो माझे शर्टचे डावे खिशात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर मी व पंच श्री.काथारा असे आम्ही माझे बलेनो कार क्रमांक.एमएच05/डीएच-1973 ने लोकसेवक मांडलेकर यांचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या कार्यालयात आलो. त्यावेळी लोकसेवक श्री.मांडलेकर हे जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात असलेल्या कन्टीनमध्ये येवून माझे बरोबर चर्चा केली त्यावेळी लोकसेवक मांडलेकर यांनी माझेकडे एकविस हजार रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम आणलीत का असे विचारले तसेच संध्याकाळी चार वाजेपर्यंत तुमचे काम करून देतो असे सांगितले. व त्यावेळी मी त्यांना मला फोन करा त्यावेळी मी येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच माझे कारने अँन्टी करप्शन ब्यूरो कार्यालय रायगड अलिबाग येथे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर श्री. बकाले साहेब, दोन्ही पंच व पथकातील सर्व स्टाफ यांनी रेकर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणावरून लोकसेवक श्री.मांडलेकर हे माझेकडे 21,000/- रूपये लाचेची मागणी करीत असून फोन केल्यानंतर लाचेची रक्कम घेवून मला त्यांच्या कार्यालयात बोलाविले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर 14-29 वाजता माझे मोबईल क्रमांक 9161911414 वर लोकसेवक श्री. मांडलेकर यांचा मोबाइ्ल क्रमांक. 8983142711 वरून फोन आला व लोकसेवक मांडलेकर यांनी मला पेपर तयार झाले, या असे म्हणाले त्यावर मी लोकसेवक श्री. मांडलेकर यांना एका तासात येतो असे सांगितले. त्यानंतर पोनि श्री.बकाले यांनी रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालयातील श्री.मांडलेकर, यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरवुन त्याअनुषंगाने करावयाची सापळापुर्व पंचनाम्याची कारवाइ समजावून सांगीतली. त्यानंतर श्री. बकाले साहेब यांनी आम्हाला सुचना देवून माझेकडुन नियोजीत सापळयाची रककम म्हणून 2000/- रू. दराच्या 10 नोटा आणि 500/- रूपये दराच्या एकुण 2 नोटा असे एकुण 21,000/- रूपये त्यांचे ताब्यात घेतले. त्यानंतर लाचेच्या रकमेच्या नोटांचे नंबर नोंदवून घेण्यात आले. त्यानंतर मला व दोन्ही पंच यांना अँ्थ्रासीन पावडर दाखवून पावडरचे गुणधर्म पोना/जितेंद्र पाटील यांनी समजावून सांगीतले. त्याप्रमाणे पावडरचे साध्या प्रकाशात व अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर मी दिलेल्या 21,000/- रूपयांच्या नोटांना पावडर लावून त्यांनी ती लाचेची रककमेची घडी करून माझे पन्टचे उजवे खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि श्री.बकाले यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सूचना दिल्या. त्यानंतर माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य 15-05 वाजता व्हाइ्इस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले. अशा रितीने माझे व पंचांसमक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाइ अँन्टी करप्शन ब्यूरो कार्यालयात केली. त्यानंतर थोडयावेळाने लोकसेवक श्री. मांडलेकर हे त्यांचे कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाहेरील कन्टीनमध्ये आले त्यावेळी आमच्यात चर्चा झाली व काही वेळाने मी व श्री. मांडलेकर व पंच श्री. काथारा असे कन्टीनचे बाहेर आलो त्यावेळी त्यावेळी लोकसेवक श्री.मांडलेकर यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली त्यावेळी मी माझे पन्टचे समोरील उजवे खिशातून लाचेची रक्कम 21000/-रूपये काढून श्री. मांडलेकर यांचे समोर धरली त्यावेळी त्यांनी किती आहेत असे विचारले असता मी त्यांना मोजून घ्या एकविस हजार आहेत असे बोललो. त्यावेळी श्री. मांडलेकर यांनी सदरची रक्कम मोजून त्यांचे पन्टचे समोरील उजवे खिशात ठेवली. त्यावेळी पंच नं.1 श्री. काथारा हे बाजूला उभे राहून आमच्यातील संभाषण पहात व ऐकत होते. त्याच वेळी मी पन्टचे समोरील डावे खिशातील रूमाल काढून डाव्या खांदयावर ठेवून लाचेची रक्कम लोकसेवक श्री.मांडलेकर यांनी स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी श्री.बकाले साहेब व पथकातील इतर अधिकारी कर्मचारी व पंच साक्षीदार माझे जवळ आले. पोशि/माळी यांनी माझेजवळील डीजिटल व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवून बंद केला. तेव्हा मी त्यांना सांगितले की लोकसेवक श्री. मांडलेकर यांनी लाचेची रक्कम त्यांचे पन्टचे समोरील उजवे खिशात ठेवलेली आहे.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. बकाले व पोना/कौस्तुभ मगर यांनी श्री. मांडलेकर यांच्या जवळ जावून 15-52 वाजता त्यांचे हात मनगटाजवळ पकडले. व लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत त्यांना विचारणा केली असता त्यांनी लाचेची रक्कम त्याचे पन्टचे समोरील उजवे खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. बकाले साहेब यांचे सूचनेप्रमाणे पंच नं. 2 श्री.पाटील यांनी लोकसेवक श्री.मांडलेकर यांचे पन्टचे समोरील उजवे खिशात असलेली लाचेची रक्कम 21,000/-रूपये बाहेर काढुन ताब्यात घेतली. त्यानंतर श्री. बकाले साहेब यांनी त्यांची व पथकाची व पंचांची त्यांना ओळख देवून त्यांना पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रशांत शंकर मांडलेकर, वय-28 वर्षे, कार्यालयीन सहायक, लेवर 2 अ, (कंत्राटी) रा. धोंडखार खोपे, पो.कोकबन, ता. रोहा, जिल्हा-रायगड असे असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. बकाले व पथकाने त्यांना कन्टीनमध्ये घेवून गेले व व पो.नि.बकाले यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी कन्टीनचे बाहेर थांबून राहीलो. काही वेळाने मला आत मध्ये बोलाविले. व माझी अँल्ट्राव्हायलेट दिवाचे प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर मला बकाले साहेबांनी पुढील कारवाइ करीता अँन्टी करप्शन ब्यूरो रायगड कार्यालय येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच व पथकातील काही कर्मचारी माझे कारने अँन्टी करप्शन ब्यूरो रायगड कार्यालय येथे आलो. त्या ठिकाणी पंचनामा टंकलिखीत करणार असलेबाबत श्री. बकाले साहेब यांनी मला सांगीतले. तसेच मला घडलेली हकिगत विचारली असता मी घडल्या प्रमाणे सविस्तर हकिगत श्री. बकाले साहेब यांना सांगीतली. अशा रितीने श्री. प्रशांत शंकर मांडलेकर, वय-28 वर्षे, कार्यालयीन सहायक, लेवर 2 अ, (कंत्राटी) रा. धोंडखार खोपे, पो.कोकबन, ता. रोहा, जिल्हा-रायगड यांनी माझेकडे श्री. झकेरीया इसाक पटेल, रा.201, साई संकल्प, सेक्टर 17,, नेरूळ, नवी मुंबई यांचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालयातील केसच्या निकालाच्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती देण्याकरीता दि. 06/02/2020 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 21,000/-रूपये (एकविस हजार रूपये) लाचेची मागणी करून, दिनांक 06/02/2020 रोजी 15-52 वाजता जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाचे आवारातील कन्टीनचे जवळ पंच साक्षीदारांसमक्ष 21,000/-रूपये लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहणुन माझी श्री. प्रशांत शंकर मांडलेकर विरुध्द फिर्याद आहे.



Scanned by CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Kerubhau Dattatray Kolhe(I (Inspector)) / POBN67105 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
अलिबाग पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Kerubhau Dattatray Kolhe
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN67105

कॉपी रिसीव



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**



Scanned by CamScanner